Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI ISSUE- IX SEPTEMBER 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# महात्मा गांधींच्या राजकीय विचारांची प्रासंगिकता

**प्रा. डॉ. कमलाकर एन. राक्षसे**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
E-mail:kamlakar7662@gmail.com

**प्रस्तावना :**

राज्यशास्त्राच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने कोणत्याही विचारवंताच्या विचारांचा अभ्यास ही विषयाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची बाब मानायला हवी. यामुळे राजकीय सिद्धांताची पाळेमुळे यात सापडता. डेव्हीड ईस्टनपासून आणि इतरही राजकीय अभ्यासकांनी राजकारणाच्या प्रत्यक्ष अभ्यासाला महत्व दिले आहे. अलिकडील काळात राजकीय तत्वज्ञानाच्या अभ्यासाला बगल देताना आपण पहात आहोत. परंतु राजकीय तत्वज्ञान/राजकीय विचारांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. यासाठीच आधुनिक भारतीय विचारातील महात्मा गांधीच्या विचारांचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते.

प्रस्तुत शोधनिबंधात महात्मा गांधीच्या विचारांची मीमांसा केलेली आहे. सदर शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

1) महात्मा गांधींच्या विचारांचा अभ्यास करणे.
2) महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता शोधणे.
3) महात्मा गांधींचे विचार सद्यकाळात गैरलागू आहेत काय? याचा शोध घेणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधन पूर्णतः द्वितीय साधनसामुग्रीवर आधारित आहे. सदर संशोधनासाठी संदर्भपुस्तके, आत्मचरित्र, विविध लेखांचा उपयोग करण्यात आला आहे.

**स्पष्टीकरण -**

देशातील आणि जगभरातील अनेक राजकीय अभ्यासकांनी गांधीवाद असा एखादा 'वाद' अस्तित्वात नाही असे म्हटलेले आहे. एवढेच काय महात्मा गांधींनीसुद्धा गांधीवाद असा एखादा 'वाद' अस्तित्वात नाही असे स्वतः म्हटले आहे. तरीपण त्यांच्या विस्तृत लेखन व कार्यातून गांधीवादी राजकीय विचारांची मांडणी आपल्याला करता येईल.

**राजकारणाचे आध्यात्मीकरण -**

गांधीवाद ही आध्यात्मवादावर आधारित एक स्वतंत्र विचार पद्धती आहे. महात्मा गांधी म्हणायचे की, 'मी राजकारणात पडलो आहे तो केवळ सत्याच्या शोधासाठी.' अर्थातच नैतिक आदर्शाचा प्रत्यक्ष राजकारणात प्रयोग त्यांनी केलेला दिसतो. महात्मा गांधी हे पक्के हिंदू होते. ते स्वतःला सनातनी हिंदू म्हणून घ्यायचे. परंतु सर्व धर्मात मूलभूत ऐक्य असल्यामुळे सर्व धर्माचे प्रामाण्य त्यांना मान्य होते. शब्द प्रामाण्याला मात्र त्यांच्या विचारात स्थान नव्हते.[1] या गोष्टीचे श्रेय ना. गोपाळ कृष्ण गोखले यांना देतात. ते असे म्हणतात की, गोखले यांनी मला सांगितले आहे की, राजकीय क्षेत्रात आपल्याला धार्मिक वृत्तीची गरज आहे. मी गोखल्यांना राजकीय गुरुस्थानी मानले आहे. त्यांच्या जीवनामागची प्रेरणाशक्ती राजकारणाला आध्यात्मिक बनविण्याची गरज आहे.

एकूणच महात्मा गांधी विषयी आपल्याला असेही म्हणता येईल की, गांधीना नैतिक व धार्मिक कल्पनांना कार्यान्वित करून राजकारण चालविता आले म्हणूनच ते राजकारणात राहिले. अर्थातच गांधीवाद मुलतः

धार्मिक मानवतावाद आहे. नीतीशास्त्र, समाजरचना व राजनीती यांना आधारभूत अशी नैतिक दृष्टी या मानवतावादात स्विकारलेली आहे.

महात्मा गांधी राजकारणाचे आध्यात्मीकरण करण्याचे ते ध्वजारोहक होते. धर्म आणि राजकारण यांचा संबंध लावून राजकारण केले तर नीतीमान राजकारण निर्माण होईल असे महात्मा गांधींच्या वरील विवेचनावरून दिसते. ही बाब सकारात्मक घेतली तर निश्चितच राजकारणाची नीती पातळी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु या ठिकाणी काही बाबी नमूद करणे गरजेचे वाटते की, आधुनिक युगातील सुरुवातीचा विचारवंत मॅकीयाव्हेली यांनी मात्र राजकारणाला धर्म आणि नीतीशास्त्रापासून संपूर्णपणे दूर करण्याचा पुरस्कार केला. मॅकियाव्हेली असे म्हणतो की, धर्म व राजकारण या दोन गोष्टी परस्परांपासून पूर्णपणे भिन्न आहेत. राज्य ही समाजातील प्रधान व प्रमुख संस्था असून धर्म ही दुय्यम व कमी महत्त्वाची संस्था आहे. मध्ययुगातील मार्सिलिओनेही राज्य व चर्च यामध्ये चर्चला दुय्यम स्थान दिले होते. मॅकीयाव्हेली असे म्हणतो की, राजाने दैववादी बनून चालणार नाही. देवावर भरवसा ठेवून किंवा देवाला दोष देवून राजकारभार चालवू नये. राजाने धर्म भावनेच्या आहारी जावू नये.

वरील ऊहापोहानंतर महात्मा गांधी आणि मॅकीयाव्हेली यांच्या विचारात अंतर दिसून येते. महात्मा गांधी म्हणतात की, नीतीमान राजकारणासाठी आध्यात्माची गरजआहे. उभयतांच्या प्रस्तुत विचारात पुसटशी रेघ आहे. परंतु मॅकीयाव्हेलीचे विचार व्यावहारिक आहेत. सध्याच्या राजकारणात व्यवहार्य आहेत.

महात्मा गांधींच्या आध्यात्मिक राजकारणात उच्च कोटीची नीतीमत्ता आहे. परंतु राजकारणात तिची किती व्यवहार्यता आहे, यावर प्रश्नचिन्ह निश्चितच आपल्याला उपस्थित करता येतील.

**महात्मा गांधी आणि साम्यवाद -**

अनेक विचारवंतांनी गांधीवाद हा हिंसारहित साम्यवादच आहे, अशा प्रकारची विधाने केली आहेत.[2] याचा सांगोपांग विचार केला तर यात सत्यता वाटण्याला निश्चितच वाव आहे. कारण दोघे अराज्यवादी आहेत. दोघांच्याही विचारांचा व कार्यक्रमांचा उगम दुःखात पडलेल्या बहुसंख्य लोकांविषयीच्या आंतरिक तळमळीतून झालेला आहे. समानता व शोषणमुक्त समाज हे दोघांच्याही विचारात आहे. मजूर आणि श्रमप्रतिष्ठा प्राप्त करून देणे व त्यांना त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करता येतील, अशा प्रकारची अर्थव्यवस्था निर्माण करणे हे ही उभय विचारसरणीत आपल्याला आढळून येते. महात्मा गांधी अहिंसावादी होते. त्यांनी प्रस्थापित समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी सत्याग्रहाचा अहिंसक मार्ग सूचविला. ह्या बाबी वगळल्यास मार्क्सच्या विचारसरणीत आणि महात्मा गांधींच्या विचारसरणीत साम्य आढळून येते, असे म्हणणे योग्य होणार नाही. साम्यवादामध्ये क्रांती, हिंसा, बलप्रयोग या बाबींना स्थान आहे. गांधी विचारात सत्य आणि अहिंसा या विचारमूल्यांना स्थान आहे. महात्मा गांधींनी साधनसूचितेला प्राधान्य दिले आहे तर साम्यवादी विचारात चांगल्या उद्दिष्टांसाठी कोणतेही साधन चालेल. महात्मा गांधींच्या विचारात धर्म आणि नैतिकता या बाबींचा स्थान आहे. परंतु धर्म आणि नीती या गोष्टी साम्यवादाला मान्य नाहीत.

वरील विवेचनावरून साम्यवादी विचारधारा व गांधींची विचारधारा यात साम्यभेद दिसून येतो.

**महात्मा गांधींचे अहिंसेचे तत्व -**

महात्मा गांधी यांचे तीन अमोघ असे अस्त्र होते की, सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या अस्त्राच्या माध्यमातून महात्मा गांधी यांनी आपल्या देशाचे स्वातंत्र्य समर लढले. सत्य आणि अहिंसा हे एकमेकांपासून अलिप्त नाहीत, असे गांधीजी म्हणतात. तरीपण अहिंसा हे साधन आहे व सत्य हे साध्य आहे, असे स्पष्टीकरण महात्मा गांधी यांनी दिले आहे. हिंसेच्या साम्राज्यात

ज्यांनी अहिंसेचा शोध लावला त्यांना महात्मा गांधी न्युटनपेक्षाही श्रेष्ठ मानतात. शस्त्रे कशी चालवावीत याचे ज्ञान झाल्यावर ती कशी विफल आहेत, याची जाणीव झाली व हिंसेने नव्हे तर अहिंसेने मुक्ती होईल असे त्यांनी जगाला सांगितले. महात्मा गांधींनी 'हरिजन' मधील लेखात क्रोधाने स्वार्थासाठी व हेतुपूर्वक कुणाला इजा करणे अथवा ठार मारणे ही जशी हिंसा आहे तशीच कोणाविषयी मनात दृष्ट भावना बाळगणे ही सुद्धा हिंसाच आहे.

महात्मा गांधींच्या सदर विचारमूल्यांवर टीकाकारांनी म्हटले आहे की, तत्कालीन काळातील समस्यांची सोयीस्कर सोडवणूक करण्यासाठी महात्मा गांधींनी अहिंसेचा सिद्धांत मांडला.[3]

महात्मा गांधीच्या या विचारावर अशा प्रकारची टीका करणे चुकीचे आहे. महात्मा गांधी तत्कालीन परिस्थितीची गरज म्हणून सदर तत्व वापरले नाही तर महात्मा गांधींच्या अंतर्मनातील अतिप्रामाणिक अशी श्रद्धा होती. महात्मा गांधींच्या मते राज्यसंस्था ही तर बोलून चालून हिंसेचीच मुर्त अविष्कृती [5] तिच्यातून हिंसावाद होणे अशक्य आहे. म्हणूनच महात्मा गांधी 'अहिंसात्मक राज्य' म्हणजे त्यांच्या मते राज्यविहीन समाज होता.

महात्मा गांधी म्हणायचे अहिंसा हे शुरांचे लक्षण आहे. ज्याच्या आत्मिक बलाचा विकास झाला आहे, त्यालाच अहिंसा शक्य आहे. हिंसा करण्याची पात्रता असून तो अहिंसेला मानतो. उदा. बलशाली युवराज, राजपुत्र सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्याठायी हिंसा करण्याचे अफाट सामर्थ्य होते. परंतु युवराज सिद्धार्थ ने अहिंसेचा मार्ग अंगिकारला व त्याने संपूर्ण जगाला करुणेचा, अहिंसेचा संदेश दिला.

एकूणच महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्वावर संशोधनात्मक प्रकाश टाकला तर त्यांच्या जीवनात त्यांनी प्रभू रामचंद्र यांना आदर्श मानले आहे. परंतु प्रभू रामचंद्र हे क्षत्रिय राजे होते. त्यांनी अनेकवेळा युद्ध केले होते तर मग महात्मा गांधींनी अहिंसेचा पुरस्कार केला होता. या ठिकाणी मात्र महात्मा गांधींच्या अहिंसा तत्त्वाबद्दल थोडी शंका घेण्यास निश्चितच वाव आहे, हे नाकारता येणार नाही.

महात्मा गांधींवर जैन, बौद्ध साहित्य विचारांचा निश्चितच प्रभाव पडलेला असेल.

**वर्गसमन्वयाचे तत्व -**

महात्मा गांधींना वर्ग कलहाची कल्पना हिंसक वाटते. ते वर्गसमन्वयाची भूमिका मांडतात. त्यांचे असे म्हणणे होते की, प्रत्येक वर्गाने दुसऱ्याचे कार्य व महत्त्व ओळखून समन्वय साधावा आणि एकमेकांचे शोषण करण्याची पद्धत सोडून द्यावी, असे त्यांचे मत होते.

वर्ग, संघर्ष, वर्गकलह भारताच्या मुळ प्रकृतीशी विसंगत आहे. आपल्याला जर अहिंसेचा संदेश कळला तर भारतात वर्ग युद्ध, वर्गकलह होणार नाही.

सदर मुद्यांच्या अनुषंगाने महात्मा गांधींची वर्ग-समन्वयाची भूमिका रास्तच आहे. परंतु भारतात वर्ग नाही तर भारतात जात आहे. जाती-जातीत संघर्ष आहे. आंद्रे विश्नोई नावाच्या एका रशियन अभ्यासकांनी असे म्हटले आहे की, भारतात वर्ग नाही, जात आहे. भारतात एखादा कनिष्ठ जातीतला व्यक्ती पैसा आणि संपत्तीने श्रीमंत आहे. म्हणून त्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळते असे नाही. म्हणून अर्थातच भारतात जातीव्यवस्था आहे, वर्ग व्यवस्था नाही.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, *"भारताचा इतिहास हा जाती संघर्षाचा इतिहास आहे. प्रत्येक जात दुसऱ्या जातीला शत्रू मानत असते."*

यानुसार आपल्याला असे म्हणता येईल की, महात्मा गांधी हे जाती निर्मुलनासाठी आग्रही नव्हते का? तर होते, परंतु त्यांचा दृष्टीकोण वेगळा होता. त्यांनी स्वराज्यापेक्षा अस्पृश्यता निर्मुलन महत्त्वाचे मानले होते. परंतु अस्पृश्यांना खास प्रतिनिधीत्व देण्यास त्यांचा विरोध होता.

**राज्यविषयक विचार -**

राज्याच्या बाबतीत महात्मा गांधींचे विचार अराज्यवादी होते. महात्मा गांधीने राज्य म्हणजे

आवश्यक बुराई आहे. तसेच राज्य व्यक्ती विकासात अडथळा निर्माण करते. त्यामुळे राज्याला मी विरोध करतो. राज्य समाजाला कायद्याची भीती दाखवून आपल्या गोष्टी समाजावर थोपवत असते. त्यामुळे हिंसेला आणि पाश्वीक अत्याचाराला वाव मिळतो. या गोष्टी नैतिकतेच्या विरूद्ध आहे.

महात्मा गांधी राज्याच्या अंताच्या पक्षात सामील होतात. ते असे म्हणत की, राज्य कितीही लोकशाही तत्त्वावर आधारित असू दे, त्याचा पाया हा हिंसा हा असतो. राज्य गरीब लोकांचे शोषण करते आणि भांडवलवादी लोकांचे रक्षण करते. राज्य हे हिंसेचे माहेरघर असून राज्य हे दमनकारी आहे.

महात्मा गांधी यांनी राज्याऐवजी आदर्श समाज अथवा राज्यविहीन लोकशाही (State Less Democracy) ची स्थापना करण्याचा विचार मांडला आहे. [4]

महात्मा गांधीजींच्यानुसार व्यक्ती साध्य आहे, राज्य साधन आहे. महात्मा गांधींनी रामराज्याची कल्पना मांडली आहे. परंतु तिला व्यावहारिक रुप देता येणार नाही. कारण सध्यकाळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थिती याला अनुकूल नाही आहे.

सारांशरुपाने महात्मा गांधींचे राजकारणाचे अध्यात्मीकरण, महात्मा गांधी आणि साम्यवाद, अहिंसेचे तत्व, वर्गसमन्वयाचे तत्व, राज्यविषयक विचार या प्रस्तुत विचारांची मीमांसा केल्यानंतर आपल्याला असे दिसून येते की, महात्मा गांधींचे काही विचार शाश्वत आहेत. काही विचार संदिग्ध आहेत तर काही विचार आजच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीस गैरलागू आहेत.

**संदर्भ सूची -**

1) डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन (पृष्ठ क्र. 504)
2) श. गो. देवगांवकर, राजकीय विचारवंत, साईनाथ प्रकाशन, नागपूर (पृष्ठ क्र. 219)
3) भास्कर लक्ष्मण भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर. (पृष्ठ क्र. 538)
4) कित्ता. (पृष्ठ क्र. 538)
5) डॉ. अवस्थी, डॉ. अवस्थी आर. के., रिसर्च पब्लिकेशन्स, जयपूर (पृष्ठ क्र. 309)